अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस पद भरतीसाठी जाहीर प्रकटन/जाहिरात

वाचा 1. (महा. शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. एबावि-2012/प्र.क्र.429/का.6 दि.13 ऑगस्ट 2014 नुसार)

2. (महा. शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. एबावि-2018/प्र.क्र.202/का.6 दि.08 ऑक्टोंबर 2018 नुसार)

3. (महा. शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. एबावि-2017/प्र.क्र.279/का.6 दि.30 नोव्हेंबर 2018 नुसार)

---

जा.क्र. एबाविसेयोतू/आस्था/कावि/71/2019
कार्यालय, एकात्मिक बालविकास सेवा योजना,
ग्रामीण प्रकल्प तूळजापूर दि. 29/07/2019

एकात्मिक बालविकास सेवा योजना ग्रामीण प्रकल्प, तुळजापूर अंतर्गत खालील नमूद केलेल्या गावात गावासमोरील रकान्यात नमूद अंगणवाडी मधील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस यांचे रिक्त झालेले पदे महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. एबावि-2012/प्र.क्र.429/का.6 दि.13 ऑगस्ट 2014 मधील निकष, अटी, शर्ती, गुणदान पध्दती चे अधिन राहून अंगणवाडी मदतनीस या मानधनी पदासाठी फक्त त्या त्या गावातील पात्र महिला उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अं.क्र | विभाग | गावाचे नाव | अंगणवाडी क्रमांक | पदनाम | | | अर्ज करण्यास सुरुवातीचा दिनांक | अर्ज करण्याचा शेवटचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अंगण वाडी सेविका | मिनी अंगणवाडी सेविका | मदतनीस | | |
| 1 | इटकळ | चिवरी | 27525090304 | - | - | 01 | 31/07/2019 | 10/08/2019 |
| 2 | माळुंब्रा | शिराढोण | 27525090404 | 01 | - | - | | |
| 3 | माळुंब्रा | काटी | 27525090415 | - | - | 01 | | |
| 4 | काटगांव | गोंधळवाडी | 27525090501 | 01 | - | - | | |
| 5 | काटगांव | पिंपळाखु. | 27525090508 | - | - | 01 | | |
| 6 | काटगांव | खडकी | 27525090527 | 01 | - | - | | |
| 7 | आरळीबु. | चिंचोली | 27525090704 | - | - | 01 | | |
| 8 | आरळीबु. | चिंचोली | 27525090705 | - | 01 | - | | |
| 9 | आरळीबु. | येवती | 27525090708 | - | - | 01 | | |
| 10 | आरळीबु. | आरळीखु. | 27525090710 | - | - | 01 | | |
| 11 | आरळीबु. | बसवंतवाडी | 27525090714 | - | - | 01 | | |
| 12 | आरळीबु. | नांदुरी | 27525090718 | - | - | 01 | | |
| 13 | आरळीबु. | काळेगांव | 27525090719 | 01 | - | - | | |
| 14 | सावरगांव | तामलवाडी | 27525090824 | - | - | 01 | | |
| 15 | सावरगांव | तामलवाडी | 27525090827 | - | - | 01 | | |
| 16 | अणदूर | सराटी | 27525090923 | - | - | 01 | | |
| **एकूण** | | | | **04** | **01** | **11** | | |

**<u>अर्जदारासाठी मार्गदर्शक सूचना, नियम, अटी व शर्ती, शैक्षणिक पात्रता व अर्जासोबत जोडावयाची कागदपत्र याबाबत सर्वसाधारण सुचना</u>**

1. उक्त पदभरती महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.एबावि 2012/ प्र.क्र.429/का-6 दि.13 ऑगस्ट 2014 मधील निकष, अटी, शर्ती, गुणदान पध्दती नुसार केली जाईल. सदर पदासाठी कोणत्याही प्रकारची लेखी परिक्षा वा मुलाखत नाही.
2. अंगणवाडी सेविका मिनी अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस ही सर्व पदे मानधनी स्वरुपाचे असल्याने या पदासाठी कोणत्याही प्रकारचे सामाजिक, समांतर आरक्षण नाही. करिता सर्व प्रवर्गातील महिलांना सदर पदासाठी अर्ज करता येईल.
3. प्रकल्प कार्यालयाने प्रमाणित केलेले विहित नमुन्यातील अर्ज स्विकारले जातील. भरती प्रक्रिया अर्जाचा विहीत नमुना प्रकल्प कार्यालयात विनामुल्य उपलब्ध आहे. अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज व त्यातील सर्व रकाने स्वता:चे हस्ताक्षरात भरावेत. तसेच अर्जात कोणत्याही प्रकारची खाडाखोड होणार नाही याची दक्षता घ्यावी. अर्ज घेताना व भरलेला अर्ज सादर करण्यासाठी उमेदवारांनी स्वत: हजर असणे आवश्यक आहे.
4. अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका या पदांसाठी अर्ज करणारे महिला उमेदवार किमान इयत्ता 10वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. अर्जदार 10 वी उत्तीर्ण असल्याबाबतचे गुणपत्रक अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अर्जदाराने 10 वी उत्तीर्णचे गुणपत्रक अर्जासोबत न जोडल्यास, अथवा अर्जामध्ये 10 वीचे फक्त गुण नमूद केल्यास 10 वीसाठीचे गुणांकन केले जाणार नाही. तथापि अर्जदार 10 वीचे पुढे 12 वी उत्तीर्ण, पदवी उत्तीर्ण असल्यास फक्त 12 वी, पदवीसाठीचे उक्त नमूद शासन निर्णयात नमूद केल्यानुसार गुणांकन करण्यात येईल.
5. अंगणवाडी मदतनीस या पदासाठी अर्ज करणारे महिला उमेदवार किमान इयत्ता 07 वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. अर्जदार 7 वी उत्तीर्ण असल्याबाबतचे गुणपत्रक अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अर्जदाराने 7 वी उत्तीर्णचे गुणपत्रक अर्जासोबत न जोडल्यास, अथवा अर्जामध्ये सातवीचे फक्त गुण नमूद केल्यास 07 वी साठीचे गुणांकन केले जाणार नाही. तथापि अर्जदार 07 वीचे पुढे 10 वी उत्तीर्ण, 12 वी उत्तीर्ण असल्यास फक्त 10 वी, 12 वी साठीचे उक्त नमूद शासननिर्णयात नमूद केल्यानुसार गुणांकन करण्यात येईल.
6. अर्ज करणाऱ्या सर्व उमेदवारांनी अर्जासोबत इयत्ता 7 वी चे गुणपत्रक जोडताना ते प्रचलित परिक्षा पध्दतीतील गुणदान पध्दतीनुसारच तयार केल्याची खात्री करुनच अर्जासोबत जोडावे. सदरील गूणपत्रके शिक्षण विभागाकडून पडताळणी करुन घेण्यात येणार आहेत. गुणपत्रक पडताळणीत सदरील गूणपत्रक प्रचलित गूणदान पध्दतीनूसार दिले नसल्याचे सिध्द झाल्यास त्याबाबतचे गूण दिले जाणार नाही याची अर्जदारानी नोंद घ्यावी.
7. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र पीआरई/2010/(136/10)प्राशि-5/दिनांक 31 ऑगस्ट 2004 अन्वये शैक्षणिक वर्ष 2005-06 पासून वार्षिक 2700 गुणांचे गुणदान पध्दत सूरु करण्यात आल्याने 2005-06 पासून पूढील वर्षात 7 वी उत्तीर्ण असल्यास 2700 गुणांचे गुणपत्रक जोडणे बंधनकारक राहिल.
8. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र पीआरई/2010/(121/2003)प्राशि-5/दिनांक 20 ऑगस्ट 2010 अन्वये शैक्षणिक वर्ष 2010-11 पासून सातत्यपूर्ण सर्वंकष मुल्यमापन कार्यपध्दती लागू करण्यात आलेली आहे. त्यात इयत्ता 7 वीचे गूणपत्रक सातत्यपूर्ण सर्वंकष

मुल्यमापन पध्दतीनूसार श्रेणी पध्दतीचे गूणपत्रक तयार होतात तथापि सदरील गुणपत्रके स्वीकारली जाणार नाहीत. श्रेणी गूणांकनाचे गूणांत रुपातर करुनच गूणपत्रक सादर करण्याची जबाबदारी अर्जदारांची राहील.

9. अर्जदार महिला ही ज्या गावात अंगणवाडी केंद्र कार्यरत आहे त्या गावातील रहिवासी असणे आवश्यक आहे. त्यामुळे जाहिरातीत नमूद केलेल्या गावातील पात्र महिला उमेदवारांना फक्त त्यांच्या स्व:ताचे गावातील पदासाठी अर्ज करता येतील. यासाठी संबधित गावचे रहिवासी असल्याचे सक्षम अधिकारी राहिवासी प्रमाणपत्र वा अधिवास प्रमाणपत्र जोडावे. सक्षम अधिकारी यांचे राहिवासी प्रमाणपत्र वा अधिवास (Domicile) प्रमाणपत्र प्रमाणपत्र अर्जासोबत जोडले नसल्यास सदर उमेदवाराचा अर्ज बाद करण्यात येईल.
10. वरील पदासाठी अर्ज करणाऱ्या महिला उमेदवाराचे कमाल वयोमर्यादा अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी किमान 21 वर्ष व कमाल 30 वयवर्ष असावे. अर्ज करण्याचे शेवटचे दिवशी कमी वा जास्त वय असल्यामुळे अपात्र ठरत असलेल्या अर्जदारांचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.
11. महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक SRV-2000/प्रक(17/2000)12, दिनांक 28 मार्च 2005 व सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. SRV-2000/प्रक(17/2000)12 दिनांक 01 जुलै 2005 नुसार सदर पदांसाठी लहान कुटूंबाची अट लागू राहील. विहित प्रतिज्ञापत्र नमुना “अ” अर्जासोबत प्रतिज्ञापन सादर करणे बंधनकारक राहील. (अविवाहित महिला उमेदवारांनी सुध्दा लागू नाही असे नमूद करुन सदर प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.)
12. अर्जदार विधवा महिला असल्यास विधवेच्या गुणांसाठी दावा करणाऱ्या उमेदवारांना गुणदान पध्दतीत अतिरिक्त 10 गुण देण्यात येतील त्या करिता विधवा उमेदवारांनी पतीचे मृत्यू नोंद दाखल्यासोबत पुर्नविवाह केला नसल्याचे स्वंयघोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील. अर्जासोबत पतीचे मृत्यू नोंद प्रमाणपत्र व पुर्नविवार केले नसल्याचे स्वंयषोषणापत्र अर्जासोबत जोडले नसल्यास अथवा विधवा असल्याबाबत इतर कोणताही पुरावा जोडल्यास त्याबाबतचे अतिरिक्त गुण दिले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.
13. अर्जदार अनाथ असल्यास अनाथासाठीचे गुणासाठी दावा करणाऱ्या अर्जदाराने खालील तक्त्यात नमूद केल्यानुसार सक्षम अधिकारी यांचे अनाथ असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील. अर्जासोबत प्रमाणपत्र जोडले नसल्यास वा अनाथबाबतचा इतर कोणताही पुरावा जोडल्यास अनाथचे अतिरिक्त गुण दिले जाणार नाहीत.

| क्र | तपशील | सक्षम अधिकारी |
|---|---|---|
| 1 | आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याची विधवा पत्नी (स्थानिक) | तहसिलदार |
| 2 | शासकीय संस्थेत राहत असलेली विधवा (स्थानिक) | जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी |
| 3 | शासन अनुदानित संस्थेत राहत असलेली विधवा (स्थानिक) | जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी |
| 4 | इतर विधवा महिला (स्थानिक) | स्वंघोषणापत्र |
| 5 | शासकीय संस्थेत राहत असलेल्या अनाथ मुली | जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी |
| 6 | शासन अनुदानीत संस्थेत राहत असलेली अनाथ मुली | जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी |

14. अनुसूचित जाती (SC) व अनुसूचित जमाती (ST) चे मागासवर्गीय उमेदवारांना अतिरिक्त 10 गुण तर विमुक्त जाती (VJ)/ भटक्या जमाती (NT), विशेष मागास प्रवर्ग(SBC), इतर मागास प्रवर्ग

(OBC) यांना अतिरिक्त 05 गुण देण्यात येतील. सदर गुण मिळण्यासाठी उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचे जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. सक्षम अधिकारी यांचे जातीचे प्रमाणपत्र नसल्यास, जात प्रमाणतपत्रासाठीची पोहच पावती अथवा इतर पुरावा अर्जासोबत जोडल्यास सदरील अतिरिक्त गुण उमेदवारास दिले जाणार नाहीत.

15. अंगणवाडी कर्मचारी म्हणून कमीत कमी दोन वर्षाचा अनुभव असल्यास अशा उमेदवारांना अनुभवासाठी 5 गुण दिले जातील. सदर अनुभवाचे गुण मिळण्यासाठी शिक्षण विभाग, समाजकल्याण विभाग, समाज कल्याण बोर्ड, कटकमंडळ इ. शासकिय बालवाडी/अंगणवाडी यांचाच अनुभव ग्राह्य धरला जाईल. खाजगी संस्थेच्या अंगणवाडी/बालवाडीचा अनुभव ग्राह्य धरला जाणार नाही. अंगणवाडीच्या अनुभवासाठी फक्त बाल विकास प्रकल्प अधिकारी व बालवाडीच्या अनुभवासाठी गट शिक्षणाधिकारी यांचे मुळ अनुभव प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील
16. अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस या पदावर अंतिम निवड झाल्यास निवड झालेल्या महिला उमेदवार जर पंचायत राज संस्थाचे (जि.प./पं.स./ग्रा.प. व इतर) सदस्य असल्यास महाराष्ट्र शासन, माहिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र. एबावि-2010/प्र.क्र.124/का-6 दिनांक 5 ऑगस्ट 2010 मधील तरतूदी नुसार त्या पदाचा राजीनामा मानधनी सेवेत रुजू होण्यापूर्वी द्यावा लागेल.
17. अर्जदाराने अर्ज दाखल करतेवेळी अर्जासोबत जोडलेली कागदपत्र व प्रमाणपत्र यांचा विचार केला जाईल व त्याआधारेच शैक्षणिक व इतर अर्हतेचे गुणांकन ग्राह्य धरले जाईल. अर्जासोबत गुणपत्रक जोडणे आवश्यक राहील. (अर्जात फक्त गुण नमूद केल्यास त्याचे गुणांकन केले जाणार नाही)
18. अर्ज करण्याच्या अंतिम तारखेनंतर कोणतेही शैक्षणिक कागदपत्र अथवा प्रमाणपत्र स्विकारले जाणार नाहीत व त्याचा गुणांकनासाठी विचार केला जाणार नाही.
19. अर्जासोबत जोडलेली सर्व शैक्षणिक गुणपत्रक, प्रमाणपत्र व इतर कागदपत्र सक्षम अधिकारी यांचे कडून सांक्षाकित करुन वा महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रसुधा1614/345/प्रक्र-71/18-अ दिनांक 09 मार्च 2015 नुसार कागदपत्राच्या स्वयंसाक्षांकित प्रति जोडणे आवश्यक राहील. अर्जासोबत कागदपत्राच्या स्वयंसाक्षांकित प्रती जोडावयाचे असल्यास उक्त नमूद शासननिर्णयातील प्रपत्र ब भरुन देणे बंधनकारक राहील.
20. सदर भरतीमध्ये अर्ज करीत असलेल्या उमेदवारांपैकी विवाहीत महिला उमेदवारांचे माहेरचे नाव व सासरचे नाव वेगवेगळे असल्याने सदरील दोन्ही नावे हे आपले स्वता:चे असून दोन्ही नावाची महिला ही एकच असल्याचे तसेच अर्जासोबत जोडलेली सर्व कागदपत्र, प्रमाणपत्र खरी व वैद्य मार्गाने मिळविली असल्याबाबत स्वघोषणापत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.
21. निवड प्रक्रिया झाल्यानंतर कोणत्याही वेळी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती किंवा कागदपत्र खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर बाद करण्यात येईल.
22. अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस यांच्या मानधनी भरती प्रक्रियेत, केंद्र शासन, राज्य शासन, मा. न्यायालय यांनी वेळोवेळी केलेल्या सुधारणा, निकषातील बदल नव्याने भरती केलेल्या सर्व अंगणवाडी मानधनी कर्मचारी यांना लागू राहील.

23. उमेदवारांनी त्यांचे निवडीबाबत कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास वा निवडीबाबत गैरमार्गाचा अवलंब केल्यास त्यांची उमेदवारी/निवड भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
24. जाहिरातीत नमूद केलेल्या अटीत बदल, जाहिरातीच्या काही भागात अंशत: बदल, भरती प्रक्रिया काही अपरिहार्य कारणास्तव काही काळापूरती स्थगित करणे, पुढे ढकलणे वा संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार नियुक्ती अधिकारी तथा बालविकास प्रकल्प अधिकारी तुळजापूर यांना राहतील.
25. उक्त पदासाठी प्रकल्प कार्यालयाने विहित नमुन्यातील प्रमाणित केलेले अर्ज आवश्यक त्या कागदपत्र व प्रमाणपत्र सह परिपुर्ण भरलेला अर्ज बाल विकास प्रकल्प अधिकारी जुना सरकारी दवाखाना, तहसील कार्यालयाचे शेजारी, मंगळवार पेठ तुळजापूर यांचे कार्यालयात दिनांक 31/07/2019 ते 10/08/2019 या कालावधीत कार्यालयीन वेळेत, स्विकारले जातील. दिनांक 10/08/2019 रोजी कार्यालय सुरु राहील.

ठिकाण :- तुळजापूर
दिनांक :- 29/07/2019

(श्रीकांत ज्ञा. हावळे)
बाल विकास प्रकल्प अधिकारी
ए.बा.वि.से.यो.ग्रा.प्रकल्प तुळजापूर

---

**अर्जासोबत जोडावयाची प्रमाणपत्र, कागदपत्र, शपथपत्र (साक्षांकित प्रती (आवश्यक तेथे मुळ)**

1. शैक्षणिक अर्हता (10 वी, 12 वी, पदवी/D.Ed/B.Ed/PG गुणपत्रक वा प्रमाणपत्र) **(अंगणवाडी सेविका साठी)**
2. शैक्षणिक अर्हता (10 वी, 12 वी, पदवी/D.Ed/B.Ed/PG गुणपत्रक वा प्रमाणपत्र) **(मिनी अंगणवाडी सेविका साठी)**
3. शैक्षणिक अर्हता (07 वी, 10 वी, 12 वी/ पदवी/D.Ed/B.Ed/PG गुणपत्रक वा प्रमाणपत्र) **(मदतनीस साठी)**
4. जन्मदिनांकाचे पुराव्यासाठी शाळा सोडल्याचा दाखला
5. सक्षम अधिकारी यांचे रहिवासी /अधिवास **(Domicile)** प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत
6. लहान कुटूंबाची अट करिता प्रतिज्ञापत्र नमुना “अ” प्रतिज्ञापत्र **(अर्जासोबत संलग्न)**
7. तहसीलदार / उप विभागीय अधिकारी यांचे जातीचे प्रमाणपत्र **(लागू असल्यास)**
8. विधवा असल्यास पतीच्या मृत्यू नोंद दाखल्यासह स्वंयघोषणापत्र **(लागू असल्यास)/जाहीर प्रगटनात नमूद केल्यानुसार**
9. अनाथ असल्यास प्रकटनात नमूद केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे यांचे प्रमाणपत्र **(लागू असल्यास)**
10. माहेर व सासरचे नाव एकच असल्याचे, तसेच अर्जासोबत जोडलेली सर्व कागदपत्र व प्रमाणपत्र खरी व वैद्य मार्गाने मिळविली असल्याबाबतचे स्वघोषणापत्र शपथपत्र, **(अर्जासोबत संलग्न)**
11. अंगणवाडी सेविका/मिनीअंगणवाडी सेविका/मदतनीस म्हणून किमान दोन वर्षाचा अनुभव **(असल्यास)**
12. अर्जासोबत कागदपत्राच्या स्वयंसाक्षांकित प्रती जोडावयाचे असल्यास प्रपत्र ब **(अर्जासोबत संलग्न)**